वर्ष ४१ अंक ४

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ

|| मराठी तितुका मेळवावा ||

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

On the web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक      एप्रिल २०२१

## अध्यक्षीय

नमस्कार मंडळी,

"आला वसंत कविकोकिल हाहि आला
आलापितो सुचवितो अरुणोदयाला"




मंडळी, लांबलचक अशा गारठयानंतर वसंत ऋतूचा मधुगंध आणि चैत्रपालवीची सळसळ मनांना पुन्हा उत्साहित करू लागली आहे. सृष्टीच्या ऋतुचक्राचं हे नव्याने सुरू होणं म्हणजे नववर्षारंभ अर्थात गुढीपाडवा! यावर्षीचा गुढीपाडवा उत्कर्ष, समृद्धी आणि आरोग्याचे दान घेऊन येवो ही शुभेच्छा !

सृष्टीच्या ऋतुचक्राबरोबरच आपल्या अभिनव कार्यक्रमांचे चक्रही अव्याहत सुरू आहे बरं का! नुकतेच मार्च २७ रोजी बृ. म. मंडळाच्या 'उत्तररंग' या विभागाचे एक दिवसीय शिबीर पार पडले. त्यामध्ये ५०० हून अधिक लोकांची उपस्थिती होती. या शिबीरात वॉटर कलर पेंटिंग, "कायद्याचे बोला", मराठी सुगम संगीत असे कार्यक्रम सादर झाले. 'उत्तररंग' या दीर्घकालीन उपक्रमाची एक कार्यकारिणी तयार झाली आहे. यामध्ये 'उत्तररंग' समन्वयक संदीप दीक्षित, बृ.म.मंडळ अध्यक्ष विद्या जोशी, सचिव कोमल चौक्कर, खजिनदार सोना भिडे, विश्वस्त मोहित चिटणीस आणि स्वेच्छा कार्यकर्त्या विद्या सप्रे यांचा समावेश आहे.उत्तररंगची कार्यपद्धती आणि स्वरूप लवकरच सगळ्या मराठी मंडळांना कळवण्यात येईल.

बृ. म. मंडळ उत्तर अमेरिका कार्यक्रमांतर्गत न्यू इंग्लंड मराठी मंडळाने "ताने स्वर रंगवावा" कार्यक्रम सादर केला. १००हून अधिक रसिकांनी त्याचा आस्वाद घेतला. त्याचप्रमाणे 'नॉक!नॉक! सेलिब्रिटी' हे नाटकअतिशय वाजवी दरात आपल्यासमोर आणणार आहे. त्यालाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल ही खात्री आहे.

बृहन्महाराष्ट्र मंडळ 'युवावाणी'च्या वतीने सादर झालेले Environmental social justice in the United States हे वेबिनारही अतिशय यशस्वी झाले. पर्यावरणविषयक नवीन ॲपचा मुलांनीही आनंद घेतला.

मंडळी, 'मन चंगा तो सब चंगा'! मानसिक स्वास्थ्य ही खरोखर काळाची गरज आहे. हे लक्षात घेऊनच त्यासाठी सुरू केलेल्या वेबिनारची सुरुवात २१ मार्च रोजी स्वाती भाकरे यांच्या वेबिनारने झाली. त्याचप्रमाणे मनाला हलकेफुलके ठेवण्यासाठी सुरू केलेल्या कराओके ग्रुप चा कार्यक्रमही अतिशय उत्साहात पार पडला.आपल्या 'रेशीमगाठी' या संकेतस्थळाची घोडदौडही जोरदार सुरू आहे. आतापर्यंत १०० हून अधिक लोकांनी नावनोंदणी केली आहे. तर असे वेगवेगळे उपक्रम व नवनवीन कल्पनांमध्ये रंग भरताना जर पाठीवर कौतुकाची थाप पडली तर उत्साह द्विगुणित होतो याचा प्रत्ययही नुकताच आला. महिला दिनाचे औचित्य साधून, Indian American Business Coalition Inc.कडून One of the 'Top 20 Chicago-land Women of Excellence 2021' हा बहुमान स्वीकारताना बृहन्महाराष्ट्र मंडळाची अध्यक्षा आणि community leader म्हणून मला अभिमान वाटतो आहे.

बृ. म. मंडळ २०२२च्या अधिवेशनाची तयारी जोरात सुरू आहे हे आपल्याला माहीत आहेच. या सोहळ्यासाठी बनवलेले अप्रतिम असे अभिमानगीत आणि "सोहळा अस्तित्वाचा!" हे घोषवाक्य यजमान मराठी विश्व न्यू जर्सी संयोजकांनी नुकतेच प्रदर्शित केले आहे. प्रथितयश गायकांच्या आवाजातील ह्या गीताचे शब्द व संगीत आहे सलील कुलकर्णी यांचे. मंडळी या गाण्याची यूट्युब लिंक https://youtu.be/VyGCpFfNvwg जरूर ऐका.

मराठी नववर्षाच्या या पर्वावर आपणही या गाण्यातील शब्दांचाच ठेका धरूया आणि गाऊया,

ध्यास मराठी...आस मराठी...श्वास मराठी रे..!

कळावे लोभ असावा, आपली नम्र,

- **विद्या जोशी** (अध्यक्षा, बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका)
Vidya.Joshi@bmmonline.org

***

## या अंकात...

- वाचकांच्या प्रतिक्रिया २
- लेखक तुमच्या भेटीला
- बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन २०२२:-सोहळा अस्तित्वाचा ३
- कथास्पर्धा
- लेख:- बुखारेस्ट बोलावतंय ४
- उत्तररंग ६
- कविता:- जलभूमी ७
- लेख:- 'लॉक अनलॉक' ८
- पुस्तक परिचय:- 'मन मुक्त... माझे !' ९
- लेख:- झूम झूम के... १०

पुरवणी ई विभाग:- बृ.म.मंडळाच्या संकेतस्थळावर
- लेख:- सहजयोग
- कविता:- अनुराधा गानू यांना श्रध्दांजलीपर
- महाराष्ट्राचे शब्दकोडे
- Poem:- We shall sustain...
- BMM YuvaVani - Newsletter
- राशिभविष्य:- एप्रिल २०२१
- Business & Matrimonial Advertisements ११-१२

## बृहन्महाराष्ट्र वृत्त

**बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र**
**स्थापना 1981 (शिकागो)**
**संस्थापक**: कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर
**संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय
**संपादन-सल्लागार:** मोहन रानडे, फिलाडेल्फिया, पेन्सिल्वेनिया
**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय**
Mohan Ranade 144 Hope Road, Holland PA 18966
Tel: 1-215-354-1423 (EST), E-mail: brihanmm@gmail.com
**वर्गणीचे दर: Printed Copy: $25/ year**
Subscription payment is accepted online by Paypal at:
http://www.bmmonline.org/vruttasubscription

**जाहिरातींचे दर**

पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या **२०** तारखेपर्यंत हाती आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर त्या नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो युनिकोड मराठीत MS word/Text Fileसह ईमेलने पाठवावा. प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील. पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०१९-२०२२)**

**मताधिकार असलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | विद्या जोशी | शिकागो, इलिनॉय |
| **सचिव** | कोमल चौक्कर | लॉस अँजलीस, कॅलिफोर्निया |
| **कोषाध्यक्ष** | सोना भिडे | फिनिक्स, ॲरिझोना |
| **सदस्य:** | मिलिंद बावडेकर | ॲटलांटा, जॉर्जिया |
| | संदीप बेलखोडे | ऑस्टिन, टेक्सास |
| | संदीप दीक्षित | क्लिवलॅंड ओहायो |
| | शिल्पा कुलकर्णी | बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स् |
| | हेमा राचमाळे | डेट्रॉइट, मिशिगन |

**नियुक्त सदस्य**

**माजी अध्यक्ष:** अविनाश पाध्ये, बॉस्टन,
**वृत्त संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय
**विश्वस्त समिती:**
**अध्यक्ष** मोहित चिटणीस, सिॲटल, वॉशिंग्टन
**सदस्य** नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
**सदस्य** सुनील सूर्यवंशी, रिजफिल्ड, कनेटिकट

...

**प्रकाशक:** बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

**संकेतस्थळ:** http://www.bmmonline.org

Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

**अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:**
vinata@gmail.com
3251 Thunderbird Court (E) Aurora IL, 60503

## वाचकांच्या प्रतिक्रिया

मार्च २०२१ बृ. वृत्तातील लेखांविषयी:

विद्या हर्डीकर सप्रे यांनी अनुराधा गानू यांच्या स्मरणार्थ लिहिलेल्या लेखाविषयी:

We were very touched by your beautiful and befitting tribute to Anuradha Ganu. Our eyes moistened to learn about her demise. We lived in Los Angeles from 1981-1992 & had a chance to witness some of her talents.

Very deeply engraved in our hearts is the memory of her playing the role of रमाबाई in the Marathi natak “ही श्रींची इच्छा”! Anuradha brought the character alive. Towards the end of the play Ramabai is getting ready for the Sati ritual. She started crying & we were all crying with her. The play ended & there was a thunderous applause. Anuradha was so much in the character that she took some time to overcome the grief.

You wrote about Anuradha’s many more outstanding contributions to our Community. We commend you for your lovely article in her honor. Thank you.

**- Alka & Vinay Patwardhan** (Bay Area, CA)

टेक्स्ट मेसेजेसमधून आलेल्या काही प्रतिक्रिया:

मार्च २०२१ अंकातील विविध लेखांतून एमिली वॉरेन, वृक्षतज्ञ जानकी अम्मल, तिम्मक्का, दुर्गाबाई भागवत या थोर स्त्रियांच्या प्रेरणादायी कार्याची ओळख झाली.

बृ. वृत्ताच्या पेपर कॉपीची पुरवणी बीएमएम- वेबसाईटवर असते ते ठिक आहे, परंतु बृ. वृत्ताची ई कॉपी पाठवताना पुरवणी जोडून किंवा पुरवणीची स्वतंत्र वेबलिंक अंकाच्या लिंकसोबत पाठवल्यास वाचायला अधिक सोयीचे होईल असे वाटते.

***

## ‘लेखक तुमच्या भेटीला’

**भाग ७:- शनिवार, मार्च २०, २०२१:- सकाळी ११-११:३० CST**
**"प्राध्यापिकेत दडलेली सुग्रण": लेखिका वसुंधरा पर्वते** (कॅलिफोर्निया) यांच्याशी **कोमल चौक्कर** (कॅलिफोर्नया) यांनी संवाद साधला. कार्यक्रमाची यूट्युब लिंक:
**https://youtu.be/FxmHUrtwr4Q**

**भाग ८:- शनिवार एप्रिल २४, २०२१, सकाळी ११-११:३० CST**
**Author Anuradha Rajapurkar**– U.S. second generation -writer. Book- **"American Betiya"** Interview By
**Vidya Joshi -Live On BMM facebook and YouTube**

***

# मराठी विश्व (न्यूजर्सी) संयोजित बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन २०२२ (ऑगस्ट ११ ते १४, २०२२) - वार्ता

- **प्रशांत कोल्हटकर** (न्यू जर्सी)
**संयोजन-प्रमुख, बृ.म.मंडळ अधिवेशन २०२२ न्यूजर्सी**



### कार्यस्थळ नक्की झालं...

ऑगस्ट ११ ते १४, २०२२ या दरम्यान होणाऱ्या बीएमएम अधिवेशनाचे ठिकाण म्हणून अटलांटिक सिटी, न्यू जर्सी मधील अटलांटिक सिटी कन्व्हेन्शन सेंटरबरोबरचा करार निश्चित झाला असून या करारावर औपचारिकरित्या स्वाक्षरी करण्यात आल्या आहेत. कार्यस्थळ तर नक्की झालं. हा एक महत्त्वाचा टप्पा आहे आणि आम्ही वैयक्तिकरित्या आपल्यासमवेत बीएमएम २०२२ उत्सव साजरा करण्यासाठी उत्सुक आहोत.

### वैयक्तिक देणगीदारांच्या अधिवेशनाची नोंदणी सुरू...

आपण कोव्हिड १९च्या संकटावर हळूहळू पण निश्चितपणे मात करत आहोत. आयुष्य लवकरच पुन्हा एकदा सुरळीत होईल हा आशावाद घेऊन बीएमएम २०२२च्या कार्यकारी समितीने अधिवेशनाच्या नियोजनाला वेग दिला आहे. अधिवेशनाला हजेरी लावण्याची तुमची वचनबद्धता, आम्हाला अर्थपूर्ण अधिवेशनाची आखणी करण्यास मदत करेल.

आपण आम्हाला कोविड नंतरचे पहिले अधिवेशन आयोजित करण्याची संधी देऊन आशीर्वाद दिला आहे, परंतु आता आम्हाला तुमच्या निश्चित आणि उदार पाठिंब्याची आर्थिकदृष्ट्या गरज आहे. वैयक्तिक देणगीदार होऊन ही अधिवेशनरुपी गणपतीची विशाल मूर्ती उचलण्यास अजून एका हाताचे बळ द्यावे व हे कार्यसिद्धीस नेण्यास हातभार लावावा ही विनंती. तुमचा आशीर्वाद आमच्या पाठीशी आहेच. देणगी पॅकेजसाठी ऑनलाईन नोंदणी कशी करावी याविषयी अधिक माहितीसाठी संकेतस्तथळ:

**https://bmm2022.org/donation/**

### कार्यक्रमासाठी प्रस्ताव सादर करा...

अधिवेशनात आयोजित होणाऱ्या कार्यक्रमांसाठी आपल्या कल्पना आणि प्रस्ताव आमच्या बीएमएम २०२२ प्रोग्रामिंग समिती कडे लवकरात लवकर पाठवा. उत्तर अमेरिका, महाराष्ट्र, भारत आणि जगातील इतर ठिकाणांहून आलेल्या मनोरंजनाच्या प्रस्तावांचा आढावा घेण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत आणि त्यातून दर्जेदार मनोरंजक कार्यक्रम निवडून तुमच्या समोर सादर करण्यासाठी वचनबद्ध आहोत. तपशीलवार सूचना, मार्गदर्शक तत्त्वे आणि ऑनलाइन आरएफपी फॉर्मसाठी खालील संकेतस्थळास भेट द्या.

**https://bmm2022.org/submit-program-proposal/**

प्रस्ताव ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे. आपल्याकडे सादर करण्यासाठी एकापेक्षा जास्त कल्पना असल्यास, त्या वेगवेगळ्या प्रस्तावस्वरूपात पाठवा. एकाच सबमिशनमध्ये एका पेक्षा अधिक प्रस्तावाचा तपशील समाविष्ट करू नका. अधिक माहिती:

**https://bmm2022.org/**

चला तर मग भेटूया ऑगस्ट ११ ते १४, २०२२, अटलांटिक सिटी, न्यू जर्सी येथे! तुम्ही आम्ही मिळून रचू एक नवा इतिहास आणि होऊ एका ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार! Welcome to BMM 2022!

***

# कथास्पर्धा




A non-profit organization in Mesa, AZ, USA Tax ID # 30-0280809

**एकता-अक्षयभाषा** कथास्पर्धेचे दुसरे वर्ष घोषित करताना आनंद होतो आहे.

- प्रायोजक (Sponsors) - एकता फाऊंडेशन, टोरांटो, कॅनडा.

**- कथा पाठवण्याची अंतिम तारीख - ४ जुलै २०२१**

कथा स्पर्धेचे नियम खालीलप्रमाणे:-

१. केवळ उत्तर अमेरिकेतील रहिवाश्यांसाठी ही स्पर्धा मर्यादित आहे.

स्पर्धा सर्व वयोगटांसाठी खुली आहे. मात्र एका स्पर्धकास एकच कथा पाठवता येईल. कथास्पर्धा प्रवेश विनामूल्य आहे.

२. कथा akshaykathaspardha@gmail.com या इमेल वर पाठवाव्यात.

कथेसोबत पूर्ण नाव, पत्ता, इमेल आणि फोन नंबर ही माहिती स्वतंत्र इमेलने पाठवावी. पूर्ण माहिती असलेल्या कथाच स्पर्धेसाठी पात्र ठरतील.

**निनावी कथाच परिक्षकांकडे पाठवल्या जातात म्हणून कथेच्या पहिल्या किंवा इतर कोणत्याही पानावर लेखकासंबंधी माहिती नसावी. तशी आढळल्यास कथा दुरुस्तीसाठी परत पाठवली जाईल.**

३. कथा Google इनपुट साधने किंवा इतर मराठी ऑनलाईन एडिटर यांचा वापर करून **unicode font** मध्येच लिहिलेली असावी. Microsoft Word file किंवा PDF या स्वरूपात पाठवावी.

४. कथा मराठी भाषेतील, संपूर्णपणे स्वतःची असावी तसेच पूर्वप्रकाशित नसावी.

५. कथेची शब्दमर्यादा १,५००-२,५०० असावी.

६. स्पर्धेला विषयाचे बंधन नाही, मात्र शक्यतो उत्तर अमेरिकेतल्या आपल्या आयुष्याशी संबंधित आणि आपल्या संदर्भ चौकटींशी निगडित विषयातील कथा असाव्यात.

७. निकाल जाहीर होण्याची तारीख-१५ ऑगस्ट २०२१.

८. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. याबाबत पत्रव्यवहार केला जाणार नाही.

९. स्पर्धेतील पहिल्या तीन विजेत्या कथांना अनुक्रमे $३००, $२००, $१०० अशी पारितोषिके दिली जातील.

१०. पारितोषिक प्राप्त आणि काही उल्लेखनीय कथा अक्षयभाषेच्या वेबसाईटवर व इ-बुकात प्रसिद्ध केल्या जातील.

११. या स्पर्धेसंबंधी काही प्रश्न असल्यास कृपया akshaybhasha@cox.net किंवा akshaykathaspardha@gmail.com येथे पाठवावेत.

ही माहिती जास्तीतजास्त लेखकांपर्यंत पोचण्यासाठी तुमच्या फेसबुक पेजवर पोस्ट केलीत आणि WhatsApp वर मित्रमैत्रिणींना पाठवलीत तर आभारी राहू. धन्यवाद !

***

# बुखारेस्ट बोलावतंय

**-माधुरी जोशी** (न्यू जर्सी)- बुखारेस्टवरून

"अग ए उठ. बॅगा भरायला पाहिजेत" अहोंनीं केलेल्या या घोषणेने मी एकदम दचकले. इतकी वर्षे मी मागे लागायचे प्रवासाबद्दल. आता माझी इतक्या वर्षाची तपश्चर्या फळाला आली की काय? त्याचं काय झालं मंडळी, मी मार्च २०१८ मध्ये २५ वर्षाच्या नोकरीनंतर निवृत्ती घेतली. आता वेळच वेळ व तो कसा मजेत घालवायचा याची मी स्वप्न रंगवत पडले होते आणि त्याचवेळी सुहासने प्रवासाची घोषणा केली. मी आनंदाने विचारले किती दिवसाची ट्रिप? "अग दिवस नाही, वर्षे. माझी एका पदावर कंपनींत नेमणूक झाली आहे. त्यासाठी युरोप आणि भारतातील काम बघायला लागणार आहे. आपलं मुक्काम पोस्ट रुमेनियातील बुखारेस्ट या गावी असेल". हे ऐकताच मी सर्वप्रथम गूगलच्या नकाशावर जाऊन हा रुमेनिया देश कुठे आहे ते पाहिले. तेव्हा असं दिसलं की जर्मनीच्या आग्नेय दिशेला जात राहिले की ऑस्ट्रिया, हंगेरी आणि मग रुमेनिया येते.


आम्ही बुखारेस्टला जाणार ही बातमी जेव्हा नातेवाईक, मित्रपरिवार यांच्यात पसरली, तेव्हा पुढचे काही दिवस आम्हाला "कसं काय बुडापेस्ट?", "रोमला कधी जाणार?" "काय म्हणतीय हंगेरी?" असे प्रश्न येऊ लागले. रुमेनिया हा देश लोकांच्या फारसा परिचयाचा नाही. आणि २० दिवसात युरोप पहा अशा जाहिरातीतील देशांच्या यादीतही रुमेनिया येत नाही, फक्त रुमेनियाची जिम्नॅस्ट नादिया कोमेनी मात्र लोकांच्या परिचयाची आहे. माझ्या मुलांनी मला इशारा दिला. "आई तुला तिथे फार कंटाळा येईल. डॅडीना जाऊ देत. तू न्यू जर्सीतच रहा." हां हां म्हणता मनाची आणि सामानाची तयारी झाली व फेब्रुवारी २०१९मध्ये आम्ही बुखारेस्टला पोहोचलो. सर्वप्रथम अपार्टमेंट शोधायला सुरवात केली. थोड्याच दिवसात माझ्या लक्षात आले, की इथली मेट्रोची व्यवस्था उत्तम आहे. तसेच सर्वत्र मोठी उद्याने, तळी आहेत. त्यामुळे अशा एका रम्य परिसरात मेट्रो स्टेशनच्या जवळ जागा मिळवली. इथले रस्ते व बाजूचे फूटपाथ अगदी मोठे, त्यामुळे चालायची छान सोय झाली. बागेमध्ये कारंजी, खूप झाडी आणि फुलं. सगळीकडे कमालीची स्वच्छता आणि शांतता. हे सगळं बघून आपले बुखारेस्टचे वास्तव्य छान जाणार याची खात्री पटली. इथले हवामानही सौम्य आहे. हिवाळ्यात क्वचित बर्फ पडते व तपमान ४० अंश फॅरेन्हाईटच्या खाली जात नाही.

एक दिवस बाहेर फिरत असताना आमच्या घराच्या समोरच्या इमारतीवर आपला तिरंगी झेंडा फडकताना दिसला. जवळ जाऊन पाहतो तर भारतीय दूतावास- कार्यालय होते. मग नंतरचे काही महिने त्यांनी आयोजित केलेल्या भारतीय सांस्कृतिक दिवस, आंतरराष्ट्रीय योग दिवस, भारताचा स्वातंत्र्य दिवस, हिंदी दिवस इत्यादी कार्यक्रमांना हजेरी लावली. भारताचे राजदूत मिस्टर दोरलॉंग व त्यांचे सहकारी यांच्याशी ओळख झाली. या कार्यक्रमांना स्थानिक रुमेनिअन लोकांचीही मोठया संख्येने उपस्थिती होती. त्यातील काही जण सतार, व्हायोलिन, तबला वादक होते. तरुणींनी फार सुंदर नृत्ये केली. तेव्हा लक्षात आले, की या मंडळींना भारतीय संगीत, नृत्य त्याचबरोबर बॉलीवूड सिनेमे यांची खूपच आवड आहे. बुखारेस्टमध्ये 'इंद्र डान्स अकादमी' आहे. येथील कलाकार भारताला भेटी देऊनही निरनिराळ्या कला शिकून येतात. त्याशिवाय 'नमस्ते इंडिया' हा उपक्रम येथे वर्षानुवर्षे चालू आहे. त्या कार्यक्रमात आयुर्वेद, योग, भारतीय संस्कृती याची माहिती देतात. भारतातले काही कलाकार येथे येऊन कार्यक्रम करतात. इथल्या तरुणी उंच, बांधेसूद व दिसायला सुंदर; त्यामुळे सगळयाच कतरीना आणि करीना! कार्यक्रमांना छान साड्या नेसून येतात. इथल्या



दूरदर्शनवर तीन बॉलीवूड चॅनेल्स येतात त्यावर हिंदी सिनेमे व मालिका चालू असतात. योगासनांचे शिक्षण इथे खूप लोकप्रिय आहे. रोमेनियन लोक भारतात जाऊन असे शिक्षण घेऊन येतात व इथे वर्ग चालवतात.

रुमेनिया देशात १९८९ पर्यंत कम्युनिस्ट सरकार होते. त्या काळात रुमेनियाची राजधानी बुखारेस्ट येथे खूप मोठया इमारती बांधल्या गेल्या. मोठे रस्ते तसेच बागा तयार केल्या. बुखारेस्ट हे "पॅरिस ऑफ द ईस्ट" या नावाने ओळखले गेले. इथेही पॅरिस शहराप्रमाणे 'Arch Of Triumph' आहे. Champs-Élysées' सारखा रस्ता आहे. या शहरात सुंदर राजवाडे, म्युझियम्स, कॉन्सर्ट हॉल्स आहेत. सर्व वास्तुकला नेत्रदीपक आहे. जगातली सर्वात मोठी सरकारी इमारत अमेरिकेतील 'Pentagon' आहे तर दुसऱ्या क्रमांकाची इमारत 'पॅलेस ऑफ पार्लमेंट' बुखारेस्टमध्ये आहे.



Palace of Parliament

१००० भव्य दालनांचा हा राजवाडा पाहून मन थक्क होते. शहरात ठिकठिकाणी बागा तर आहेतच पण सुंदर कारंजी सुद्धा आहेत. उनिरी (Uniri) नावाच्या परिसरात शनिवार, रविवार रात्री प्रकाश व ध्वनी माध्यमांतून असंख्य कारंज्यांचा देखाव्यांचा कार्यक्रम असतो. नेत्रदीपक रंगांची उधळण संगीताच्या तालावर नाचणाऱ्या पाण्यात दिसते. १९९० सालापासून येथे लोकशाही आल्यावर देशाची आर्थिक सुधारणा होऊ लागली.

बुखारेस्टमध्ये ट्राम्स, बसेस, मेट्रो, टॅक्सी, उबर अशी विविध प्रकारची वाहतुकीची व्यवस्था आहे. पण औद्योगिक क्रांती

झाल्यामुळे गाड्यांची संख्या आणि रस्त्यावरची वाहतूक वाढली. गाड्या लहान असतात आणि जागा मिळाली नाही तर लोक चक्क फूटपाथवर गाड्या लावतात. कुठल्याही रस्त्यांवर ५०० वर्षांहून अधिक जुने चर्च व सुंदर इमारती उत्तम स्थितीत दिसतात. आपला इतिहास जतन करून ठेवण्याची त्यांची धडपड आणि सौंदर्य दृष्टी पाहून या लोकांच्या मनाची श्रीमंती लक्षात येते.

रुमेनियाला डोंगर व काळा समुद्र याची साथ लाभली आहे. त्यामुळे शहराबाहेर पडल्यावर अफाट सृष्टी-सौंदर्य आहे. इथले लोक स्कीइंग, हायकिंग त्याचप्रमाणे समुद्र किनाऱ्यावर जाऊन मनमुराद आनंद लुटतात. बुखारेस्ट जवळच्या शहरात पूर्वीच्या राजांचे राजवाडे, किल्ले आहेत. असाच एक ड्रॅक्युलाचा किल्ला आहे. त्याचे नाव ब्रान कॅसल. रुमेनियाच्या इतिहासात एक रक्तपिपासू, लोकांना छळणारा 'Vlad the Impaler' नावाचा राजा होता. त्यावर Bram Stoker नावाच्या आयरिश लेखकाने ड्रॅक्युला हे काल्पनिक व्यक्तिचित्र रेखाटले. अजूनही त्याची प्रसिद्धी एव्हढी आहे, की हॅलोविनच्या दिवशी अमेरिकन लोक या ड्रॅक्युलाच्या किल्ल्यात गर्दी करतात. जगभरातील लोकांना ड्रॅक्युलाविषयी खूप कुतुहल आहे.

२००७मध्ये रुमेनिया देश युरोपियन युनियनमध्ये सहभागी झाला. त्यामुळे इथल्या लोकांना देशाबाहेर जाणे सोपे झाले. आता येथील खूप लोक युरोपमध्ये इतरत्र कामासाठी राहतात. इथली स्वच्छतेची व मेहनतीची सर्व कामे स्थानिक लोकच करतात. त्यामुळे या कामासाठी इतर देशातील लोक येत नाहीत. कोणी आलेच तर त्यांना थोड्या वर्षांचा कामाचा परवाना मिळतो. येथे भारतीय थोडेच आहेत. काही कामानिमित्त आलेले किंवा काही योग शिक्षक म्हणून आलेले आहेत. एकंदरीत रुमेनिअन लोक खूप मेहनती आणि प्रामाणिक आहेत. सर्वत्र रेस्टॉरंट्स खूप आहेत. इतर युरोपियन शहरांप्रमाणे इथेही माणसं फूटपाथवर खुर्च्या, टेबले टाकून मजेत जेवत बसलेली दिसतात. इथे भारतीय जेवण मिळते पण त्या हॉटेलचे आचारी रुमेनिअन असल्याने आपलं घरचं जेवण ते खरं, असे आम्ही ठरवले.

भारतीय वाणसामान ऑनलाईन मागवता येते. लंडनहून ते दोन दिवसात घरपोच मिळते. इथे फार्मर्स मार्केट्स खूप आहेत. तेथे शेतात काम करणाऱ्या बायका अगदी ताजी भाजी आणि फळे घेऊन येतात. भाज्या ताज्या व ऑरगॅनिक असल्याने भाज्या शिजवल्यावर चव अतिशय चांगली लागते. या मार्केटमध्ये गेल्यावर लहानपणी पुण्याच्या मंडईत गेल्यावर जो आनंद मिळायचा तसा मला आनंद होतो. आता माझी ओळख झाल्याने ज्यांच्याकडे कोथिंबिर, मिरच्या, पुदिना असेल ते आवर्जून माझ्या पुढ्यात ठेवतात. गंमत म्हणजे इथे कोथिंबीर फ्रान्सहून येते. या शेतकऱ्यांशी बोलायचे तर थोडी तरी रुमेनिअन भाषा आली पाहिजे या हेतूने मी भाषेची शिकवणी लावली. रुमेनिअन भाषा लॅटिन भाषेवर तयार केली आहे. इंग्रजी शब्दांशी काहीच साम्य नाही. मी रुमेनिअन भाषेतील काही प्रचलित वाक्य, आकडे, फळभाज्यांची नावे शिकून घेतली. भाषेचे व्याकरणही अवघड. ज्यावेळी Ice Creamला Inghetata म्हणतात हे ऐकले तेव्हा माझे रुमेनिअन भाषेचे शिक्षण गुंडाळून ठेवले. आता जय हो Google Translator!

बुखारेस्टला आल्यावर इथल्या लोकांच्या ओळखी व्हाव्यात म्हणून एक गट शोधून काढला. त्याचे नाव Internations. यामध्ये इतर देशातील थोड्या दिवसासाठी बुखारेस्टला आलेले आणि काही स्थानिक लोकही आहेत. सर्व माहिती एका ॲपवर असते. याचा मला चांगला अनुभव आल्याने त्यांनी ठरवलेल्या बऱ्याच कार्यक्रमांस आम्ही हजेरी लावली. म्युझियम्स, उपहारगृहे, चर्चेस, नाट्यगृह व चित्रपटगृह यांना भेटी दिल्या. अतिशय सुंदर ऐतिहासिक कॉन्सर्ट हॉल्समध्ये फिल्हार्मोनिक, जाझ कॉन्सर्ट्स् याचा मनसोक्त आनंद लुटला. मुख्य म्हणजे निरनिराळ्या लोकांशी इंग्रजीत बोलण्याची संधी मिळाली. बरीच माहिती मिळाली. विचारांची देवाणघेवाण झाली आणि एक नवीनच हुरूप आला. न्यू जर्सीतील मराठी विश्व व सर्व मित्रमंडळी सोडून परक्या देशात आलो. पण या ग्रुपमुळे आम्हाला "हे विश्वची माझे घर" याची प्रचिती आली. त्यातूनच नटालिया या एका रुमेनिअन बाईशी ओळख झाली. तिला भारतीय पदार्थ खायची इच्छा होती. मलाही रुमेनिअन लोक शाकाहारी पदार्थ काय खातात याची उत्सुकता होती. मग ठरले, एकत्र स्वयंपाक करायचा. तिच्या शेतातील घरावर ती आम्हाला घेऊन गेली. तिच्या बागेत झाडांवर टोमॅटो लगडले होते. इथल्या दुकानात पनीर सारखे चीज मिळाले. मी टोमॅटोचे सार व पनीर मसाला करायचे ठरवले. नटालियाच्या आईने अतिशय उत्साहाने भाज्या घालून पायज् (pies) केल्या. नटालियाने रुमेनिअन ब्रेड व सॅलड केले. नंतर मोकळ्या हवेत एकत्र जेवताना जो काही आनंद मिळाला तो काही वेगळाच होता. त्यानंतर मी त्या सर्वांना घरी बोलावून खमंग वडे, डोसा खायला घातले.

रुमेनिअन लोक शांतता-प्रेमी आणि कुटुंबवत्सल आहेत. इथल्या बऱ्याच लोकांच्या आडनावात Cu असते; (Enescu, Popescu) जसा आपल्याकडे कर (तेंडुलकर, पेटकर...) शब्द आडनावात येतो.

या लोकांविषयी माझा अनुभव म्हणजे ते मितभाषी आहेत. कदाचित इंग्लिश सर्रास बोलत नाहीत म्हणून असेल. पण काम मात्र मनापासून करतात आणि जमेल तशी मदत करतात. इथले लोक सुट्टी किंवा सणवारी ऑफिसचे काम करत नाहीत. दर वर्षी १-२ महिने रजा घेऊन कुटुंबाबरोबर वेळ घालवतात. मी असेही ऐकले, की नवीन आईला दोन वर्षांची पगारी रजा मिळते. सुट्टीच्या दिवशी सर्वजण कुटुंबीयासह बागेत फिरतात, सायकली चालवतात. एकंदर आरोग्यपूर्ण जीवनपध्दतीमुळे अतिलठ्ठपणाचे प्रमाण अगदी कमी आहे. KFC, McDonalds तरुणांमध्ये लोकप्रिय आहेत. बहुतेक प्रत्येक कुटुंबाबरोबर एकतरी कुत्रा असतोच. इथे गुन्हेगारीचे प्रमाण अगदी कमी आहे. रात्री उशिरा घरी चालत आले तरी अजिबात भीती वाटत नाही. मला लोकांनी सांगितले, की तू रात्री दोन वाजता सुद्धा बागेत फिरायला एकटी जाऊ शकतेस. अर्थात अजून हे धाडस नाही केले.

मला इथल्या आवडलेल्या काही गोष्टी म्हणजे इमारतीतील सर्व दिवे सेन्सरवर असतात त्यामुळे विनाकारण वीज जळत नाही. हॉटेलमध्ये कुठेही प्लॅस्टिक किंवा पेपरचा वापर करत नाहीत. किराणा-मालाच्या दुकानात किंवा मंडईत मागितली तरच प्लॅस्टिकची पिशवी पैसे देऊन मिळते. एकंदर इथे सुबत्ता कमी असली तरी लोक समाधानी व आनंदी वाटतात. अर्थात माझे हे निरीक्षण गेल्या दोन वर्षांच्या वास्तव्यातील आहे.

२०१९ साल हे असे गडबडीत व मजेत गेले. मग उजाडले २०२० आणि जगभर कोरोना विषाणूमुळे जो हाहाकार उडाला त्याचे पडसाद रुमेनियातही उमटले. सर्व प्रथम लॉक-डाउन, मग दुकानात मास्क घालणे, माणसांपासून दूर राहणे हे सर्व ओघाने आलेच. आता सर्वत्र मास्क घालून फिरावे लागते आणि त्याची सवय झाली आहे. प्रवास कमी झाला. लोकांना भेटणे थांबले. पण बुखारेस्टमधील लोकांनी शांतपणे सरकारच्या सर्व आज्ञा पाळल्या. त्यामुळे कोरोनाची लागण तशी कमी लोकांना झाली.

बुखारेस्ट हे युरोपच्या पूर्वेला आहे. तेथून एक ते तीन तासाच्या विमान-प्रवासाने बऱ्याच देशांना जाता येते. सुहासच्या कामानिमित्त किंवा सुट्टी म्हणून बरीच भटकंती झाली.

पोर्तुगाल, स्वित्झर्लंड, स्लोवाकिया, इटली, यु.के. ऑस्ट्रिया, बल्गेरिया, हंगेरी, फ्रान्स, चेक रिपब्लिक, टर्की, इजिप्त... असा हा प्रवास चालूच आहे. परंतु दरवेळी मी जेव्हा बुखारेस्टच्या घरी परतते तेव्हा प्रसन्न वाटते, आपल्या घरी आल्यासारखे वाटते. म्हणूनच वाटते;
"बुखारेस्ट बोलावतंय."

# उत्तररंग

**एकमेकांचे धरुनी हात | सुखशान्तीची शोधू वाट ||**
**चला राहू आनंदात | आयुष्याच्या उत्तररंगात ||**

बृ . म. मंडळाच्या "उत्तररंग" प्रकल्पांच्या माहितीसाठी
संपर्क: **संदीप दीक्षित** बृ. म. मंडळ कार्यकारिणी सदस्य, उत्तररंग नेतृत्व, **फोन क्र**. 1-216-926-6696
**ईमेल** sandeep.dixit@bmmonline.org
**विद्या जोशी** - अध्यक्षा, बृ. म. मंडळ
**फोन क्र**. 1-224-321-2948
ईमेल Vidya.Joshi@bmmonline.org

........................................................

**- स्मिता कंटक** (विल्मिंग्टन, डेलावेअर)

## उत्तररंग व्याख्यानसत्र:- ४२

### सायबर सिक्युरिटी

व्याख्याते श्री. समीर अहिरराव मेरीलँडमध्ये स्थायिक असून Ardent या Data Privacy कंपनीचे ते संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. १३ फेब्रुवारी २०२१ रोजी "Kahoot" या प्रश्नोत्तरांच्या खेळाने या सत्राची सुरुवात झाली.



श्री. अहिरराव यांनी आंतरजालावर आपली महत्त्वाची माहिती सुरक्षित राखण्यासाठी काही उपाय सुचविले: पासवर्ड म्हणून एकच शब्द न वापरता एखादे वाक्य वापरावे. विविध अक्षरे, आकडे, चिन्हे वापरून पासवर्ड कठीण करावा, आणि अधूनमधून बदलावा. पासवर्डबरोबर प्रश्न किंवा OTP असे दोन सुरक्षास्त्र वापरावे. ईमेल आणि आर्थिक व्यवहारासाठी निरनिराळे पासवर्ड ठेवावेत. सोशल मीडियावर, ब्लॉग्जवर प्रतिसाद लिहिताना आपले इमेल पत्ते देऊ नयेत. संगणकावर ऑपरेटिंग सिस्टीमची सर्वात नवी आवृत्ती वापरावी. ती जुन्या आवृत्तीपेक्षा जास्त सुरक्षित असते. सार्वजनिक वायफाय (Wi-Fi) वापरणे टाळावे. त्याऐवजी VPN वापरावे. बनावट ईमेल किंवा फोनवर आपली वैयक्तिक माहिती देऊ नये. बँकेशी स्वतः थेट संपर्क साधावा.

**कोविड -१९ लसविषयक शास्त्र:**

व्याख्याते डॉ. सतीश घाटपांडे कनेक्टिकट येथे राहतात. ते मॉलेक्युलर बायोलॉजिस्ट असून, कर्करोगासारख्या दुर्धर आजारांवरील औषधविषयक संशोधनात कार्यरत आहेत. डॉ. घाटपांडे यांनी कोविड-१९ विषाणू आणि mRNA लस याबद्दलची शास्त्रीय माहिती सांगितली.

विविध प्रकारचे कोरोना विषाणू यापूर्वी अस्तित्वात होते. परंतु कोविड-१९ ची साथ फैलावणारा SARS-CoV-2 हा नवा, वेगळा प्रकार आहे. हा विषाणू DNA ऐवजी RNA वापरून जनुकीय माहिती साठवतो. या माहितीनुसार त्याच्या पृष्ठभागावर टोकदार प्रथिने निर्माण होतात. ती मानवी पेशीवरच्या ACE2 प्रथिनांना जोडून हा विषाणू मानवी पेशीत प्रवेश करतो.

फायझर आणि मॉडर्ना या दोन्ही कंपन्यांच्या लसींमध्ये रासायनिक प्रक्रियेने तयार केलेले mRNA वापरले आहे. त्यामधील माहितीनुसार निरुपद्रवी टोकदार प्रथिने निर्माण होतात. ही अनोळखी प्रथिने पाहून आपली रोगप्रतिकारशक्ती त्यांना विरोधी अँटीबॉडीज निर्माण करते.

mRNA लसींमध्ये कोविड-१९चा विषाणू घातलेला नाही. या लसी आपल्या DNAच्या संपर्कात येत नाहीत. लसींमधल्या mRNAचा वापर झाल्यानंतर आपल्या पेशी त्याचे विघटन करून ते नष्ट करतात. लसींमधले mRNA जैविक पद्धतीऐवजी रासायनिक पद्धतीने तयार केल्यामुळे या लसी थोड्या अवधीत निर्माण झाल्या आहेत.


डॉ. घाटपांडे यांची कन्या डॉ. सायली घाटपांडे (फार्मासिस्ट) यांनीदेखील या माहितीत भर घालत, गरोदर स्त्रियांमध्ये या लसींचा वापर करणे सुरक्षित आहे असे सांगितले.

***

**Uttarrang Session No. 43- section 1:**
**"Antiquity of Indian Civilization"**
**Speaker: Anil Ketkar, Report By Vaishali Wagh**

Anil Ketkar comes with a research background and continues doing research based on the factual evidences in multiple scientific disciplines such as, Archaeology, Genetics, Oceanography, Geology, Seismology, Hydrology and Astronomy.

In this multi-disciplinary talk on "**Antiquity of Indian Civilization"**, Anil Ketkar discussed the progress of human civilization against the backdrop of a stable global climate system. He discussed how the climate after the Last Glacial Maximum and around the Holocene enabled human migration from Africa.



He illustrated how humans came to settle around the Indus and Saraswati rivers, establishing the Harappan-civilization. The now arid regions around north-western India were blessed with much stronger monsoons in the past, enabling early Indians to settle around the major rivers in the region. He then went on to emphatically quash the Aryan invasion theory, arguing that the migration of the early Indians (Harappans) was due to a tectonic change in the Himalayas as well as a prolonged drought that caused the Saraswati river to completely dry up. He also refuted the erroneous research methods used to support the "Aryan-Dravidian divide".

***

## उत्तररंग एक दिवसीय शिबीर

मार्च २७, २०२१ रोजी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या 'उत्तररंग'- उपक्रमांतर्गत प्रथमच संपूर्ण **ऑनलाईन** पध्दतीने एक दिवसाचे शिबीर आयोजित केले होते. अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झालेल्या या शिबिरात सुमारे ५०० मंडळी उपस्थित होती. शिबिरात उद्बोधक आणि मनोरंजक १२ सत्रे आयोजित केली होती. उत्तररंग विभाग प्रमुख संदीप दीक्षित, सर्व सहकारी कार्यकर्ते, बृ. म. मंडळ कार्यकारिणी, आणि उपस्थित मंडळी या सर्वांचा या कार्यक्रमाच्या यशामध्ये मोलाचा वाटा आहे.

***

# जलभूमी (वेटलँड्स)



- **विजया मराठे** (पमोना, कॅलिफोर्निया)

दक्षिण कॅलिफोर्नियातील 'हंटिंग्टन बीच' या सागरी किनाऱ्याजवळच 'बोलसा चिका' नावाच्या जलभूमी आहेत. त्यांचा बहुतांशी भाग सँटा ॲना नदीपासून व काही भाग सागरापासून निर्माण झालेला आहे. पाणी जेव्हा उंचवट्यापासून खोलगट भागात वाहते व साचते तेंव्हा या जलभूमीची निर्मिती होते. त्यातील दुर्मीळ जलवनस्पती, कीटक व विविध पक्षांमुळे, हे पाणी व आजूबाजूची हवाही शुध्द असते. हे शांत निळे जल, पाण्यात डुंबणारी विविध प्रकारची बदके व आकाशात उडणारे पक्षी असे दृष्य खूप विलोभनीय वाटते. खळाळणाऱ्या सागराच्या पार्श्वभूमीवर निर्मल शांत जलभूमीकडे पाहताना सुचलेली ही कविता:

नाही लहरी सागराची, ओहोटी वा भरती
जलभूमीत शांत जळ, आहे अमोल माती

नाही भन्नाट लाटा, नाही गती भरतीची
नाही आस आदळत, किनारा गाठण्याची

नाही लाटांचा खळखळाट, तुषारांचे सुरुंग
आहे झुळूझुळू वारा, मंद आनंद तरंग

नाही येथे ओहोटी, नकळत खोल जाणे
नाही भोवऱ्यात अडकूनी, गोल गोल फिरणे

आहे पोषक भूमी, अन् निर्मल जल शांत
अमोल वनमाला, वसती बदके निवांत

काही बदके सुरूप अन् काही कुरूप
नांदती आनंदे, अन् डुंबती करून कळप

विहंगमाला मुक्त विहरती आसमंतात
घेऊन निळाई नभाची, डोकावती जळात

जलभूमीत करकोचे जणु, योगी भासती
शुभ्र,धवल वसनात हो, शोभून दिसती

निरव शांतता, जलही असे हे तटस्थ
वाटे हो मनाला, बसावे निवांत ध्यानस्थ

विश्वची माझे घर, सारेच सोबती संगती
जगा जीवन शांत, हे जलभूमी शिकवती

***




## पुरवणी - ई विभाग (बृ. म. मंडळाच्या संकेतस्थळावर)

- लेख:- सहजयोग- **पद्मिनी दिवेकर** (नेपरव्हिल, इलिनॉय)
- कविता:- अनुराधा गानू यांना श्रध्दांजलीपर- **विजया मराठे** (पमोना, कॅलिफोर्निया)
- महाराष्ट्राचे शब्दकोडे - सुधीर देशमुख (टॅम्पा, फ़्लोरिडा)
- Poem:- We shall Sustain... **By Dr. Chaitanya Patwardhan** (Shrewsbury, MA)


To read above supplement section,
Click: https://bmmonline.org/vrutta-supplements/
- Yuva-Vani: Newsletter, April 2021:
Click: https://bmmonline.org/yuva-vani-archives/
- राशिभविष्य: एप्रिल २०२१ - **दादा दामले** (न्यू जर्सी)
Click: https://bmmonline.org/rashi-bhavishya/

**शके १९४३**
**चैत्र शुध्द प्रतिपदा**
**गुढीपाडवा**

**या नववर्षानिमित्त**
**सर्वांना**
**हार्दिक शुभेच्छा !**

# लॉक अनलॉक

**- प्राजक्ता पाडगांवकर** (कम्मिंग, जॉर्जिया)



"अँड दॅट इज अ रॅप, अडियोस मुझझईज, लव्ह लव्ह"

मान तिरपी करून तिच्या स्टायलिश बॉबला हलवत मिहिराने शेवटचा 'पाऊट' करत, सेल्फी स्टिकवरचे बटण दाबले! संपले रेकॉर्डिंग! आज इथे पार्कमध्ये गर्दी नसल्यामुळे तिचे शूट मस्त पार पडले होते! तमाम जनता ही कोव्हिडच्या कोपामुळे घरात कोंडली गेली असताना, मिहिराला ही एक आयती संधीच वाटली, तिचे सगळे शूट्स करण्यासाठी! अटलांटात सगळीकडे मोकळीक! बागा, रस्ते, नदीकिनारे कुठेही तुरळक गर्दी आणि अजिबात गोंगाट नाही! आज ती सुवानीच्या सिटी हॉलपाशी आली होती. इथे फुकटचे वाय फाय होतेच, आणि दिवस फॉलचे, त्यामुळे सगळी झाडं रंगीत पानांनी नटलेली! बॅकग्राऊंड बोके देखील सुरेख मिळत होती!

मिहिरा जामच खुश होती! शूट मनासारखे झाले तसे तिने तिचे सगळे सामान भरायला सुरवात केली! तिच्या भल्यामोठ्या काळ्या जिम बॅगमध्ये ती ट्रायपॉड, एक्सटेंशन वायर, लाईट्स असे व्यवस्थित ठेऊन देऊ लागली.

तेवढ्यात तिचे लक्ष जवळच्या पायऱ्यांकडे गेले. तिथे एक फिरंग बाई शांत बसली होती! गेली अनेक आठवडे घरातल्या लोकांव्यतिरिक्त फक्त असे कॅमेरात बोलून मिहिरा तशीही थोडी कावली होतीच, ही एक निराळीच संधी म्हणून तिने दुरूनच त्या फिरंगी म्हातारीला हात केला! प्रतिउत्तरादाखल तिनेदेखील मिहिराची दखल घेतली.

सगळे सामान व्यवस्थित भरून, बॅगची चेन लावून मिहिरा स्वतःचा मास्क सावरत त्या बाईपाशी पोचली. सहा एक फुटावर थांबून पुन्हा हात केला आणि हाय असे जुजबीच म्हणाली.

"यू कॅन सीट अराऊंड दॅट एज आय गेस... "

"श्युर" मिळालेले निमंत्रण स्वीकारत मिहिरा बसली.

"लव्हली फॉल वेदर राइट?" मिहिराने अगदी सराईत सुरवात केली.

" आर यू फ्रॉम इंडिया?"

"ये राईट... "

"फ्रॉम विच पार्ट ऑफ इंडिया?"

"वेल्ल द वेस्टर्न पार्ट, से लाईक मुंबई... " ह्या बाईला भारत नकाशावर दाखवता येईल का नाही अशा होऱ्यात मिहिराने सावधपणे सांगायला सुरवात केली, तोवर यॉर्कर आला,

" सो डू यू अन्डरस्टँड मराठी?"

"आ! ओह व्वा! ये, श्युर आय डू" अमेरिकेतल्या आठ वर्षात पहिल्यांदाच उलटी प्रश्नावली तिच्या समोर येत होती. आतून मिहिरा थोडी जास्तच उसवत चालली होती. मराठी? घरच्यांशीदेखील कुठे होतं मराठीत बोलणं आता, आणि ही फिरंग हे काय विचारते आहे!"

"मला मराठी येतं, आवडतं, पण इथे कोणी भेटत नाही मला सध्या !" ती आजी एका दमात बोलून गेली संपूर्ण मराठी वाक्य!

"व्हाऊ! सुपर्ब! मराठी कसं येतं?

"मी नोकरी करत होते शिकागो विद्यापीठाच्या साऊथ एशियन लँग्वेजेस अँड सिव्हिलायझेशन विभागात, आता निवृत्ती जवळ आली आहे, सध्या लॉकडाउनमध्ये इथे मुलाकडे अडकले आहे. माझं नाव क्लॉडिया रॉबर्ट"

मिहिरा नुसती ऐकत राहिली! थक्क होऊन, कसला योगायोग होता हा! ती इथे येऊन फॅशन इन्फ्लुएन्सर बनत, स्वतःची भाषा, तिचा लहेजा जास्तीत जास्त अमेरिकन कसा वाटेल ह्यावर गेली तीन एक वर्ष लक्ष केंद्रित करत होती, तर इथे ही बाई चक्क मराठी शिकवत होती! मिहिराकडे ह्याहून अधिक बोलण्यासारखे तसे कधी खूप नसे, तिला ह्याच गोष्टीची मजा वाटे, की तिने स्वतःकडे इतर कोणाचे तरी लक्ष वेधले आहे, बस्स! मात्र आज अनेक वर्षांनी, खोल आत ठिबकत असलेल्या आठवणी सहज पाझरू लागल्या...आज तिला कदाचित बोलायचंदेखील नव्हतं, फक्त ऐकायचं होतं! तिला तिची भाषा ऐकायची होती, नव्याने, नव्या आवाजात, नव्याच चालीत, निराळ्या ढंगात!

घरी फोन केला तरी तिची अमराठी वहिनी, इंग्रजी बोलणारी भाचरं आणि सासरी सराईतपणे गुजराथी, इंग्रजी बोलणारी सगळी! कुठेतरी आजीनंतर घरातले वातावरण मराठीपासून दुरावू लागले होते. तिची आईदेखील क्वचितच मराठी बोले... मिहिराला इंग्रजी उत्तम यायला हवं हीच तिची इच्छा! त्याप्रमाणे करत करत सरलेली ही मिहिराच्या बालपणीची भाषा आज अवचित तिला बागेत भेटली होती.

क्लॉडियादेखील ह्या मुलीला न्याहाळत होती, भारतातली ही निराळी पिढी होती, अमेरिकन होण्याच्या ध्यासाने पछाडलेली. स्वतःची संस्कृती, भाषा आणि सगळे सांस्कृतिक वैभव सहज सोडू शकणारी निराळी पिढी.

गेल्या काही आठवड्यात हे संपूर्ण जग बंद पडल्याने, दोघींकडे तसा पुष्कळ मुबलक वेळ तर होताच, त्यात एकमेकींविषयी पुष्कळ कुतूहल वाटावे अशी व्यक्तिमत्व!

"तुम्ही बोला न मराठी! मला ऐकायला खूप छान वाटतं आहे! मला पण फार मराठी येत नाही, आय मिन माय डॅड इज मराठी, मॉम स्पोक हिंदी अँड नाऊ माय ब्रदर इज मॅरीड टू अ बेंगाली गर्ल अँड आय मॅरीड अ सेकण्ड जेन अमेरिकन गुज्जू, आय मीन गुजराथी गाय"

"तुझ्या मराठीत पुष्कळ इंग्रजी शब्द तू सहज वापरतेस, त्याने लय तुटते अगं."

"म्हणजे?"

"तू आणि मी बोलतो आहोत, त्या एका भाषेत बोलण्याने, त्याला एक समान लय तयार होते, तू मध्येच इंग्रजी शब्द वापरलेस की ती लय जाते! माझी मैत्रीण सुनंदा मला नेहेमी सांगते, विद्यार्थ्यांशी मराठीत बोलताना, कटाक्षाने, इंग्रजी शब्द टाळावे म्हणून"

"तुम्ही शिकवाल मला, परत मराठी बोलायला? माझीच भाषा मात्र आता ती मला नव्याने ऐकावी, शिकावी वाटते आहे"

"भाषा ना, एक मोठा विभ्रम आहे, एक काल्पनिक गोष्ट आहे, जी आपण आपल्या समूहाशी जोडून राहण्यासाठी शिकतो. भाषा कोणतीही असो, ती काल्पनिकच असते. आपण ठरवतो, म्हणून एखाद्या आवाजाला एखाद अर्थ आपण जोडून देतो आणि ते समीकरण सगळे मान्य करतात, म्हणून कदाचित भाषा प्रचलित होतात. उदा. पा.ल.क. म्हणजे पेरेंट्स किंवा भाजी, पण

जर मला कोणी शिकवलं असतं, की पा.ल.क. म्हणजे अंड; तर मी त्यावर अजिबात प्रश्न न करता तेच समीकरण मान्य केलं असतं, नाही का? म्हणून तर भाषा अशी सहज शिकता येत नाही, शिकवताही येत नाही. भाषेचा लहेजा आणि लय पकडून आपण आपली वाटचाल सुरूच ठेवायची."

"बापरे!"

" फार बोलते आहे का मी?"

"नाही नाही, इट्स जस्ट टू मच फॉर मी!"

" बरं, कधी मरणाच्या दारी जाऊन परत आली आहेस का?"

"काय?"

"सांग ना, पण मराठीत."

"वेल, प्रयत्न करते...तीन वर्षांपूर्वी, मी प्रागला गेले होते. तिथे आम्ही गाडी चालवत होतो, अचानक समोरून एक ट्रक आला आणि माझे नियंत्रण सुटले, गाडी, त्यातल्या इतर दोन मुली आणि मी, तिघी एकदम किंचाळलो, गाडीने एक पलटी खाल्ली आणि घसरून कडेला जाऊन थांबली...:गॉश, माय आज्जी वूड ह्याव बीन सो प्राऊड, सो मच मराठी ह्याव आय लर्न्ट!"

"तसं नाही... त्या क्षणात तू कोणते शब्द बोललीस? गाडीत असताना?"

"देवा परमेश्वरा!"

"म्हणजे तुझ्यातली भाषा मराठीच आहे! बाकी अनेक भाषा येत असून तू आपसूक मराठीत बोललीस ना! म्हणजे तुझ्यात आहे मराठी, मग शिकायची काहीच गरज नाही!"

"बापरे! भलतेच काही समजले मला!"

"बघ किती सहज भाषा बोलू लागलीस तू! आणि तुझ्यामुळे मीदेखील, नाही का?"

"ह्म्म, धिस इज नाइस! माझं कार्ड आहे हे, लेट्स कीप इन टच!"

"अख्खे जग सध्या बंद असताना, आपण अशा बागेत भेटलो आणि मराठीत बोललो, हीच खूप मोठी आठवण असेल माझ्यासाठी! तू मराठी बोलत राहा!"

क्षीण हसत मिहिरा अचानक उठून चालू लागली, औपचारिक निरोप घेत...

जगभरात सगळे बंद असताना, तिला अचानक तिची मनाची भाषा गवसली होती, तिचे सध्याचे काम, भाषेबद्दल आणि त्या भाषेची गोडी लावणाऱ्या बाबांबद्दल ती पुन्हा विचार करू लागली, आत्ता कुठे असेल तिचा बाबा? लॉकडाउनमध्ये कुठे अडकला असेल? कोणत्या जहाजावर? का कोणत्या किनारी?

ही कोण अनोळखी बाई भेटली, किती सहज उसवले तिने तिच्या मनाचे टाके, किती सहज तिच्या मनात डोकावली ती! सगळा मेकअप, सगळे मुखवटे भेदून तिला आरपार बघितलं ह्या बाईने...

गेली सतरा वर्षे मिहिराच्या मनात जी व्यक्ती, जी भाषा गोठून पडली होती, तिच्या आईबाबांच्या डिव्होर्सनंतर, ती कधी भेटलीच नव्हती तिच्या बाबाला! कधी बोललीच नव्हती त्याची भाषा.

सभोवतालचे सगळे केशरी, पिवळे, तपकिरी आणि हिरवे रंग एकमेकात मिसळत आहेत आणि आपल्याला त्या गर्तेत ओढून घेत आहेत, असेच वाटत राहिले, काही खूप तळाशी गेलेलं, अचानक ढवळून वर आलं! भाषेचा तरंग, त्यावर आठवणींचा तवंग... बाबा!


गाडीपाशी उभी राहून मिहिरा गढुळलेल्या नजरेने, दूर शोधत राहिली ते क्षितिज, जिथे तिचा बाबा होता, जिथे त्याची भाषा होती आणि जिथे पूर्ण कुटुंबाची ऊब होती! बाहेर लॉकडाउन आणि इथे तिच्या मनात आठवणी अशा अचानक अनलॉक झालेल्या!

***

# पुस्तक परिचय-'मन मुक्त...माझे!'

**- उमा सहस्रबुध्दे** (मुंबई)

पॉन्टे विड्रा बीच, फ्लोरिडा येथील **नीलिमा गुणे - गोळे यांचे 'मन मुक्त... माझे!'** हे ललित-लेखांचे पुस्तक ग्रंथाली'ने गेल्यावर्षी प्रकाशित केले असून त्यास प्रसिध्द कवयित्री व लेखिका- नीरजा यांची प्रस्तावना लाभली आहे.




लेखिका नीलिमा गुणे -गोळे मुंबईत वाढल्या. त्यांनी सर जे. जे स्कूल ऑफ आर्ट्स् मधून जी.डी. आर्ट्स्, 'स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्क, बफेलो' येथून बी.ए. (सायकॉलॉजी व जेरॉटॉलॉजी) आणि एम.बी. ए. (फायनान्स) पदव्या प्राप्त केल्या.

लहानपणापासूनच त्यांना वाचनाची खूप आवड होती. अमेरिकेत १९७७ साली आगमन झाल्यावर त्यांच्यामध्ये लेखनाची आवड निर्माण झाली. गेल्या अनेक वर्षांत लोकसत्ता, किर्लोस्कर व एकता त्रैमासिकामधून त्यांचे वेळोवेळी लेख प्रकाशित झाले. अशा काही पूर्वप्रसिद्ध व काही नवीन लेखांचे संकलन या पुस्तकात आहे.

लेखिकेने आपले मनोगत 'या ह्रदयीचे' असे छानसे शीर्षक देऊन ह्रदयालाच हात घातला आहे. नीरजाने प्रस्तावनेत लिहिल्याप्रमाणे लेखिका स्वत:ला कोणत्याही एका फॉर्ममध्ये बंदिस्त करून न घेतां मुक्तपणे व्यक्त होतेय आणि तीच या पुस्तकाची खासियत आहे.

या पुस्तकात लेखिकेच्या काही प्रियजनांची व्यक्तिचित्रणं व अमेरिकेतील मनावर ठसा उमटवून गेलेल्या स्वानुभवांवर लेख आहेत. तसेच 'माझी कलासफर' सारखी काही आत्मनिवेदनं, डोळ्यांसमोर तंतोतंत उभी ठाकणारी काही प्रवासवर्णनं आणि भावपूर्ण कविताही आहेत.

सगळ्याच ललित लेखांची भाषा आकर्षक व ओघवती आहे. निसर्गवर्णन करतांना ती विशेष बहरून येते. 'आकाशातल्या नीलिम्याला बघून हिरवीगार तृणपाती हसू लागली' अशा सुंदर वर्णनातून ती जाणवत राहते. याचबरोबर लेखिका उत्तम चित्रकार असल्याने त्यांनी रेखाटलेल्या काही चित्रांचा या पुस्तकात समावेश आहे. एका वाक्यात वर्णन करायचं तर हे पुस्तक म्हणजे लेखिकेच्या भावविश्वाचा, मनसमृध्दीचा 'कलायडोस्कोप' आहे.

या पुस्तकाची प्रत विकत घेण्यांसाठी संपर्क : -

ईमेल:- neelimagole@yahoo.com

सेलफोन:- +1 (904) 401-1509

***

# "झूम झूम के"...

**- विनता कुलकर्णी** (शिकागो)

आपल्या स्मृतिकोषाच्या कॅमेराचे भिंग "zoom in" करून २०२०सालाकडे पाहताना मनांत आले, की २०२०मधे कित्येकांना संवादाचे दालन उघडण्यांस 'झूम पासवर्ड' हाच जणुं परवलीचा शब्द ठरला. 'झूम सॉफ्टवेअर'चा जनक एरिक सुब्रह युआन हा चिनीवंशाचा एक अमेरिकन अब्जाधीश व्यापारी व अभियंता! २१ एप्रिल २०११साली अमेरिकेत स्थापन झालेल्या 'झूम व्हिडिओ कम्युनिकेशन्स इन्क' कंपनीचा युहान हा मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संस्थापक आहे. २०१९च्या अखेरीस चीनमधे कोव्हिड१९ विषाणूचा उगम झाला. त्यानंतर सामाजिक दूरी, लॉकडाउन, इत्यादी कारणांनी 'झूम' सॉफ्टवेअरच्या वापरात लक्षणीय वाढ झाली.

मार्च ११, २०२० रोजी 'वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन'ने कोरोना विषाणूमुळे महामारीचा उद्रेक सर्वत्र पसरला असल्याचे जाहीर केले आणि अनेकांना अभूतपूर्व परिस्थितीची जाणीव झाली. मात्र काहीजण कोव्हिड म्हणजे निव्वळ "होक्स", असं म्हणत, विनामास्क गर्दी करून हिंडत, विषाणू जगभर पसरण्यास हातभार (की तोंडभार?) लावत राहिले. १५ मार्च २०२० रोजी कोव्हिडमुळे आमच्या इलिनॉय राज्यासह अमेरिकेतील अनेक राज्यातील बहुतांशी शाळा, कॉलेज, रेस्टॉरंट्स बार, चित्रपट व नाट्यगृहे बंद किंवा २५ टक्क्याहून कमी उपस्थिती लागू झाली. वर्षभरात 'फेस मास्क', 'हॅन्ड सॅनिटायजर', 'सोशल डिस्टन्सिंग', 'झूम' या शब्दांच्या "वापराने" विक्रमी उच्चांक गाठला.

कोव्हिडच्या भीतीने कुणी स्वतःच्या नियोजित शस्त्रक्रिया पुढे ढकलल्या. कुणी कुटुंबियांसमवेत दिवसाचे २४ तास प्रथमच घरी सकारात्मक रीतीने घालवू लागले, कुणी आपल्या अंतर्मनात, सर्जनशील छिद्रात डोकावू लागले, तर काही ठिकाणी 'डोमेस्टिक व्हायोलन्स'च्या केसेस वाढल्या. कुणाला क्षणभंगुर जीवनाचा साक्षात्कार, तर कुणाला नैराश्याचा मनोविकार... अशा अनेकविध कहाण्या गेल्या वर्षभरात जगापुढे आल्या.

अमेरिकेतील एक होतकरू लेखिका आणि एक कलाकार असे तरुण जोडपे. कोरोना काळात, कामच बंद झाल्याने, त्यांना अपार्टमेंटचे भाडे भरणेही अशक्य झाले. त्यांनी शहर सोडण्याचा निर्णय घेतला आणि हार्बरसाइड वन्य परिसरात कॅम्पर व्हॅनमध्ये संसार थाटून दोघेही शेतावर काम करू लागले. तिथे त्यांच्यासारखे विस्थापित अनेक नवकामगार होते. अगदी फ्लाइट अटेंडंट, इव्हेंट कोऑर्डिनेटर, कॉलेजमधील विद्यार्थी, रेस्टॉरंट-शेफ आणि अनेक. काहींकडे महागडी गाडी, पण बाकी कफल्लक... त्यांच्यासाठी "कोरोना-व्हायरस" वादळामधे ते शेत हेच एक आश्रयस्थान ठरले. 'सेलफोन सेवा', 'वायफाय', 'टीव्ही' हे काहीही नाही, मात्र सुरक्षित जगण्याच्या विचाराने अनोळखी माणसे त्या निसर्गसान्निध्यात एकमेकांशी मनाने जोडली गेली.

कोव्हिडचा धोका फक्त वृध्दांना... असा समज असलेली पस्तिशीतील एक महिला सांगते, ती कोरोना-बाधित तर झालीच, पण काही दिवसांत बरी होण्याऐवजी तिला दोनदा रुग्णालयात अतिदक्षता विभागात दाखल व्हावे लागले आणि त्यानंतर डोकेदुखी, बोलण्यात दोष, अशक्तपणा, चक्कर येणे यावर इलाजासाठी कित्येक महिने ती पुनर्वसन केंद्रात राहते आहे.

एका संस्थेत उच्च पदावर अधिकारी असलेली एक महिला सांगते, मार्च २०२०पासून कोविड परिस्थितीमुळे आपल्या दोन वर्षे वयाच्या जुळ्या मुलांना पाळणाघरात ठेवणे अशक्य झाल्याने ती नोकरी सोडून वर्षभर घरी आहे. आणि या काळात नव्याने स्वतःला व मुलांनाही अनेक चांगल्या सवयी लावते आहे.

नुकतेच इमर्जन्सी मेडिसिनमधे रेसिडेन्सी पूर्ण करून कामावर रुजू झालेला एक डॉक्टर सांगतो, २०२०च्या एप्रिल-मे सुमारास, कोव्हिडवॉर्डात खूपच अत्यवस्थ रुग्ण असत. त्यांच्या अंत्यसमयी जवळ कोणीही नातेवाईक नसत. कामाचा ताण आणि अनेक मृतांची नोंद करताना त्यालाच नैराश्य आले होते.

याउलट विशीतला एक तरुण 'स्प्रिंगब्रेक'साठी २०२०च्या मार्च महिन्यात युनिव्हर्सिटीमधून घरी आलेला. त्यानंतर परीक्षा, ग्रॅज्युएशन सेरेमनी ऑनलाईनच झाले. कॉलेज शिक्षणानंतर मित्रमैत्रिणींना मिठ्या मारून निरोप नाही, ठरवलेली क्रूज पिकनिक नाही, त्यामुळे हा अँग्री यंग मॅन त्रस्त झाला आहे.

आपल्या तीन व पाच वर्षे वयाच्या मुलांचे २०२० हे वर्ष बरेचसे घराच्या चार भिंतीतच गेल्याने एका आईबाबांनी नाराजी व्यक्त केली. तर आपल्या उरल्यासुरल्या आयुष्यातील एक वर्ष कुणाही समवयस्कांना, मुलानातवंडांना प्रत्यक्ष न भेटता एकाकी घालवल्याने ८५+ वर्षे वयाचे एक आजीआजोबा खंतावले आहेत.

ही केवळ प्रातिनिधिक उदाहरणे आहेत. मात्र कोव्हिड काळातही लोक कौटुंबिक, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रम, वाढदिवस, आप्तेष्टांच्या अंत्यसंस्कारासही ऑनलाईन उपस्थित राहू लागले. मुळात माणसाची जीवेच्छा चिवट! गेलेल्याबद्दल "Grief is a remnant of unconditional love." असं काहीसं तत्त्वज्ञान गाठीशी बांधून माणसं जगत राहतात.

२०२० वर्षाच्या अखेरीस वैज्ञानिकांच्या परिश्रमाने कोव्हिड-भूयारापलिकडे प्रकाश दिसू लागला. सॅन्ड्रा लिंडसे ही अमेरिकेत लाँग आयलंड, न्यूयॉर्क येथील मेडिकल सेंटरच्या अतिदक्षता विभागाची संचालक. क्लिनिकल चाचण्यांनंतर १५ डिसेंबर २०२० रोजी फायझर निर्मित कोविड-१९ लसीचा पहिला 'डोस' प्राप्त झालेली अमेरिकेतील ही पहिली व्यक्ती. त्यावेळी तिचा फोटो आणि तिच्या वैद्यकीय स्क्रबवरचे स्टिकर "Crushing COVID-19, got my vaccine" वृत्तमाध्यमांद्वारे सर्वत्र झळकले. असे स्टिकर व आपले सेल्फी फोटो सोशल मीडियावर लावण्यास अमेरिकन सेंटर फॉर डिसीज कन्ट्रोल'देखील प्रोत्साहन देते आहे; इतरांनी कोव्हिड लस घेण्यास प्रवृत्त व्हावे या उद्देशाने!

२०२१ साल उजाडले आणि अवतीभवती एक प्रश्न कानी पडू लागला, "घेतली का?"(लस, दारू नव्हे) 🙂 प्रश्नाचा रोख कळण्याइतपत बहुतेकजण वर्षभरात शहाणे झाले असावेत! (मार्च २०२१च्या अखेरीस जगभरातून कोरोनाने २८ लाखाहून अधिक (२.८+ मिलियन्स) माणसांचे बळी घेतले आहेत. (संदर्भ- https://www.statista.com/) मात्र कोव्हिड-प्रतिबंधक लस घेतली तरीही, सध्या मास्क लावणे, गर्दी टाळणे इ. चुकले नाही. (कारण लस घेऊनही नंतर काहींना कमी गंभीर स्वरूपात-कोव्हिड१९चा संसर्ग झाल्याची उदाहरणे आहेत.) परिस्थिती सुरळीत होण्यास २०२२ साल उजाडेल, की अधिक काळ हे कोव्हिड- विषयक तज्ञही सध्या ठामपणे सांगू शकत नाही.

भविष्यात या परिस्थितीकडे वळून पाहताना विघातक आणि विधायक अविस्मरणीय क्षणांचे वेगळेपण अधिक ठळकपणे नोंदले जाईल यात शंका नाही. परंतु सध्यातरी झूम सॉफ्टवेअरशी सख्य आणि कोव्हिड प्रतिबंधात्मक लस घेणे एव्हढे निश्चितच हाती आहे. लवकरच मोकळ्या वातावरणात, आप्तमित्रांसह

"झूम झूम के नाचो आज... नाचो आज
गाओ खुशी के गीत हो, गाओ खुशी के गीत"...

असं खऱ्या अर्थाने एकत्रितपणे लोक म्हणू लागोत, हीच सदिच्छा!

***

# Foundation for Small Charities India Inc. (FSCI)

(A 501 (C) (3) Tax Exempt Charity)

Now, you can give to your, school, college, or University which launched your career and landed you in the USA. You can give them to keep up the good work in molding excellence out of the ordinary.

You can create a grant in the memory of your parents who did all sacrifice to see you achieve.

You can give it to any NGO doing good work that you cherish and admire. They need not have the 80-G Certification in India. We have FSC in Pune with 80-G and FCRA license.

Give name, address, person to contact, phone and
mobile contact numbers email address, to help us deliver fast !

Visit: “Smallcharity.Org” for more detail
C/O Ramesh Sarva CPA.,

Phone: 718-268-4933 Fax: 718-575-3375
Email: Ramesh@Sarva.Org
Cell Phone: # 347-232-8668

**Or simply mail your check to:**
**Foundation for Small Charities India, Inc**
**183 S. Broadway,#210**
**Hicksville NY 11801**

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

Subscription Remittance Address
BMM Newsletter
144 Hope Road,
Holland, PA 18966-5408

BMM
बृहन्महाराष्ट्र मंडळ



नाते जुळते मनाशी मनाचे




Reshimgathee

**A BMM Matrimonial Initiative for Maharashtrians in North America**

https://reshimgathee.bmmonline.org/

**HEALTH INSURANCE**

**INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR**

*** VISITORS**
*** H-1 B VISA HOLDERS**
*** PERMANENT RESIDENTS**
**( Some restrictions apply)**

**For more information:**

**Contact: Padmaja Bapat**
**Independent Insurance Agent**

**616 Rhodes Hill Court**
**Martinez, GA 30907**

Tel: **888 705 8271**

E-mail: padmaja.p.bapat@gmail.com

Website: **visitors-insurance.com**